महाराष्ट्र शासन
# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, बारामती
प्लॉट पी -१०७ एम.आय.डी.सी.आवार, महिला रुग्णालयासमोर, बारामती पिन नं. ४१३१३३
Email-admgmcbaramati@gmail.com Ph : ०२११२-२४४१७२

जा.क्र. पुअहोशावैमबा/राजप / 1884/२०२६ दिनांक: 12 /०५/२०२६

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, बारामती या महाविद्यालयात सहाय्यक प्राध्यापक यांची रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात मानधन तत्वावर स्थानिक निवड मंडळ समितीच्या शिफारशी नुसार १८० दिवसांकरिता पदे भरण्यासाठी खालीलप्रमाणे जाहिरात तयार करण्यात आलेली आहे.

## जाहिरात

विषयः- सहाय्यक प्राध्यापक यांची रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात मानधन तत्वावर स्थानिक निवड मंडळ समितीच्या शिफारशीनुसार १८० दिवसांकरिता भरण्याबाबत...

संदर्भः- १.मंजूर टिपणी दिनांक १२/०५/२०२६
२.शासन निर्णय १९९३
३.शासननिर्णयक्रंपदनि-२०१९/प्र.क्र/१२/भाग.-१/वैसेवा-२ दि.१ फेब्रुवारी,२०२१
४.शासन निर्णय क्र एलईसी-४३२२/प्र.क्र.२०१/वैसेवा-३ दि.०६/०१/२०२३
५.शासन निर्णय क्र एमईडी-२००८/प्र.क्र.३९३/शिक्षण-२ दि.०२/१२/२०२३
६.मा.संचालनालयाचे पत्र क्र DMER .१२०१६/५/२०२२-EDU दि.१९/०१/२०२३
७.मा.संचालनालयाचे पत्र क्र DMER .११०२०/१३/२०२२-CETIT दि.१९/०१/२०२३

राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाच्या त्रुटीच्या पुर्ततेसाठी तसेच दैनंदिन रुग्णसेवा अवाधित राहण्याच्या दृष्टीने अधिष्ठाता, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, बारामती. या संस्थेच्या अस्थापनेवरील अचिकीत्सालयीन व चिकीत्सालयीन विषयांतील रिक्त असलेली सहाय्यक प्राध्यापक (गट-व), यांची पदे मा.संचालनालय, मुंबई यांच्या मार्फत बंधपत्रीत उमेदवार उपलब्ध किंवा महाराष्ट्र लोकसेवा आयोग पुरस्कृत उमेदवाराची नियुक्ती होईपर्यंत किंवा बदलीने उमेदवार उपलब्ध होइपर्यंत किंवा तदर्थ पदोन्नतीने कार्यरत सहयोगी प्राध्यापक मुळ पदावर पदावनत होईपर्यंत यापैकी जे आगोदर घडेल तोपर्यंत, स्थानिक निवड मंडळ समितीच्या शिफारशीनुसार १८० दिवसांच्या कालावधीकरिता कंत्राटी तत्वावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात शासनाच्या प्रचलित नियमानुसार अनुज्ञेय असलेल्या वेतनश्रेणीत गुणवत्तेनुसार भरण्याकरिता पात्र उमेदवारांकडून खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून अर्ज मागवण्यात येत आहेत. मुलाखतीसाठी स्वतंत्र पत्र पाठविण्यात येणार नाही.यांची नोंद घेण्यात यावी.
अर्ज सादर करावयाचा कालावधी दि.१२/०५/२०२६ ते १९/०५/२०२६ रोजी सायंकाळी ४.४५ वाजे पर्यंत.

**मुलाखतीचा दिनांकः**- दि.२२/०५/२०२६ रोजी सकाळी ११ वाजता (मुलाखतीस मुळ प्रमाणपत्रे सादर करणे बंधनकारक आहे)
**मुलाखतीचे ठिकाणः**- मा.अधिष्ठाता दालन, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, बारामती.

त्यानुसार इच्छुक उमेदवारांनी (शासकीय सुटटी वगळुन) या कार्यालयातून जाहिरातीच्या दिनांकापासुन विहीत कालावधीत अर्ज शुल्क रु.१००/- (अक्षरी रुपये शंभर फक्त) रोखपाल शाखेत भरुन अर्ज प्राप्त करुन घ्यावेत अर्जात नमुद कागदपत्रे प्रमाणपत्रांसह साक्षांकीत केलेल्या प्रती अर्जासोबत जोडणे अत्यंत आवश्यक आहे. मुलाखतीच्या वेळी उमेदवारांनी मुळ प्रमाणपत्रांसह साक्षांकीत केलेल्या प्रतींचा एक संच सोवत घेउन येणे आवश्यक आहे. उमेदवारांनी मुलाखतीच्या ठिकाणी सहाय्यक प्राध्यापक संवर्गातील १८० दिवसांकरिता भरावयाच्या पदांची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

Scanned with OKEN Scanner

पदाचे नावः- सहाय्यक प्राध्यापक एकुण पदे:- ३२

## VACANT POST ASSISTANT PROFESSOR

वरील सहाय्यक प्राध्यापक सवंर्गातील रिक्त पदांचे विषय निहाय आवश्यक पदे खालीलप्रमाणे आहेत. उमेदवारांच्या उपलब्धतेनूसार उमेदवाराचा प्रवर्ग व रिक्त पदाचे आरक्षण यांचा विचार करुन अंतिम निवड समितीच्या शिफारशीनुसार करण्यात येईल.

| Sr. No | Subject | Total Post | SC | ST | VJ-A DTA | NT (B) | NT (C) | NT (D) | SBC | OBC | SEBC | EWS | OPEN |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 13% | 7% | 3% | 2.50% | 3.50% | 2% | 2% | 19% | 10% | 10% | 28% |
| 1) | Anatomy | 2 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 |
| 2) | Physiology | 1 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 3) | Ophthalmology | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 4) | Pathology | 2 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 |
| 5) | Pharmacology | 2 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 1 |
| 6) | Community Medicine | 5 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 1 | 1 | 1 | 0 | 1 |
| 7) | General Medicine | 3 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 1 |
| 8) | Paediatrics | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 |
| 9) | Pulmonary Medicine | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 |
| 10) | Psychiatry | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 0 |
| 11) | General Surgery | 3 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 1 | 0 |
| 12) | Orthopaedics | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 |
| 13) | OBGY | 2 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 0 |
| 14) | Anaesthesiology | 4 | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 1 |
| 15) | Radiology | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 |
| 16) | ENT | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 0 |
| 17) | Dentistry | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 |
| | **Total** | 32 | 4 | 2 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 6 | 3 | 3 | 9 |

उक्त नमुद दर्शविलेल्या रिक्त जागांची संख्या प्रशासकीय कारणास्तव बदलण्याचे अधिकार प्रशासनास राहतील, तक्त्यात नमुद केलेल्या पद संख्येत वदल होण्याची शक्यता आहे. वरील सर्व पदांसाठी जाहीर केलेल्या रिक्त पदासाठी अर्ज मागविण्यात येत असून, वरील तक्तयाप्रमाणे रिक्त पदांच्या उपलब्धतेप्रमाणे प्रथम निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्त्या देण्यात येतील व तदनंतर रिक्त पद उपलब्ध झाल्यास प्रतिक्षा यादीतील उमेदवारांना गुणवत्तेप्रमाणे नियुक्तीचे आदेश निर्गमित करण्यात येतील.

Scanned with OKEN Scanner

उमेदवाराची कागदपत्रे परिपूर्ण नसल्यास अर्जाचा विचार केला जाणार नाही. वरिल पदांकरीता नियुक्ती तात्पुरत्या स्वरुपात १८० दिवसांसाठी असून, कोणतीही पूर्व सुचना न देता तात्पुरती कंत्राटी सेवा समाप्त करण्यात येईल.

## अटी व शर्ती

शैक्षणिक पात्रता–

| Sl. No. | Posts | Qualification | Teaching experience, research, and other requirements |
|---|---|---|---|
| 1. | Assistant Professor | MD/MS/DNB/ MSc PhD | As per NMC notification 14.02.2022 & 30.06.2025<br>(a) one year as Senior Resident in the concerned subject as specified in regulation 8 in a recognised medical institution.<br>Note 1: The requirement of one-year Senior Resident experience is relaxed for those appointed directly as Assistant Professor in Government medical institute immediately before the publication of these regulations.<br>Note 2: The experience gained by a Tutor in a medical institution of his specialty, having a postgraduate degree, shall be considered equivalent to the experience required as a Senior Resident for the purpose of eligibility for the post of Assistant Professor.<br>Note 3: The experience gained by a Demonstrator in a medical institution of his specialty, having a Master of Science and Doctor of Philosophy degree, shall be considered equivalent to the experience required as a Senior Resident for the purpose of eligibility for the post of Assistant Professor; or<br>(b) Specialist Medical Officers of the Armed Forces having at least one year teaching experience or two years of clinical experience after obtaining the requisite postgraduate qualification in the concerned subject.<br>Note: In the specialty of Aviation Medicine and Marine Medicine two years of such experience in flying Squadrons and in Diving and Escape training Schools respectively will be considered equivalent to one year of teaching experience (in lieu of Senior Resident) to become an Assistant Professor; or<br>(c) a non-teaching Consultant or Specialist or Medical Officer, possessing postgraduate medical degree with at least two years of experience in a Government hospital having at least 220 beds shall be eligible to become an Assistant Professor of that broad specialty without the requirement of experience as Senior Resident and shall complete the Basic Course in Biomedical Research within two years of appointment; or<br>diploma holders appointed as SeniorResidents in a recognised medical institution before 08.06.2017 having total experience of four years as Senior Resident; or<br>(e) diploma holders working as Specialist or Medical Officer in the respective departments of a government medical institution or Government medical institution running National Board of Examination and Medical Science recognised teaching programme having cumulative experience of six years |

Scanned with OKEN Scanner

१. सहाय्यक प्राध्यापक पदाची वेतन श्रेणी- सदरील उमेदवारांना दि.३१/१२/२०२० च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार रु.१०००००/- (अक्षरी रुपये एक लक्ष मात्र) इतके ठोक मानधन दरमहा अनुज्ञेय राहील. सदरील वेतन संस्थेत मंजुर असलेल्या मुळ अनुदानातून १०-कंत्राटी सेवा या उद्दिष्टामधून भागविण्यात येईल.

२. उमेदवाराच्या निवडीबाबत प्राधान्य क्रम:- शा.नि.क्र. डीएसबी-१२०१/प्र.क्र.२७६/२००१/विसेवा-३ दि.२७.०२.२००४ मधील तरतुदीनुसार पदव्युत्तर व पदवी अभ्यासक्रम पुर्ण केलेल्या बंधपत्रित उमेदवारास निवडीमध्ये प्रथम प्राधान्य देण्यात येईल.

३. वयोमर्यादा किमान व कमाल वयोमर्यादा

| वयोमर्यादा गणण्याचा दिनांक | किमान वय | कमाल वय | | | | दिव्यांग उमेदवार |
|---|---|---|---|---|---|---|
| | | सर्वसाधारण/महिला | | प्राविण्य प्राप्त खेळाडू | | |
| | | अराखीव (खुला) | मागासवर्गीय/आर्थिकदृष्टया दुर्बल घटक /अनाथ | अराखीव (खुला) | मागासवर्गीय/आर्थिकदृष्टया दुर्बल घटक /अनाथ | |
| | १८ | ४० | ४५ | ४३ | ४५ | ४५ |

४. गुणवत्ता यादी ही पदव्युत्तर पदवी परीक्षेच्या एमडी/एमएस/एमसीएच/डीएम/किंवा समतुल्य अर्हता प्राप्त परीक्षेच्या गुणांवर व मुलाखती व्दारे ठरविण्यात येईल. संशोधन लेख (शोधनिबंध) राज्य व अखिल भारतीय स्तरावरील परिषदेतील सहभाग याचा प्राधान्याने विचार करण्यात येईल. तसेच सदर पदाचा अनुभव असल्यास प्राधान्य देण्यात येईल.

५. जाहिरातीत प्रसिध्द करण्यात आलेली पदसंख्या कमी जास्त करण्याची अधिकार अधिष्ठाता यांना राखून ठेवलेले आहेत.

६. उमेदवार या महाविद्यालया व्यतिरिक्त इतर संस्थेत कार्यरत असल्यास संस्था प्रमुखांचे नाहरकत प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे, व त्याठिकाणी राष्ट्रीय आयुर्विज्ञान परिषदेच्या निरिक्षणात सहभाग नोंदविला किंवा तसे असल्यास केव्हा (तारीख नमुद करावी) व तसेच अर्जासोबत जोडावे.

७. ज्या उमेदवारांची निवड करण्यात आली असेल व ते कार्यरत असताना सतत जास्त कालावधीपर्यंत गैरहजर असल्यास किंवा त्यांचे काम समाधानकारक नसल्यास त्यांची कंत्राटी नियुक्ती तात्काळ समाप्त करण्यत येईल.

टिप:-

१. ज्या उमेदवारांना संचालनालयाकडुन मध्यवर्ती निवड प्रक्रियेद्वारे या पुर्वी सहाय्यक प्राध्यापक विपेशज्ञ वैद्यकीय अधिकारी व वैद्यकीय अधिकारी या पदाकरिता शिफारस/ निवड करण्यास आली आहे. असे उमेदवार या मुलाखतीस पात्र राहणार नाहीत.

२. निवड प्राप्त उमेदवारांना कोव्हिड-१९ तथा आपत्कालीन परिस्थीतीच्या अनुशंगाने सेवा करणे बंधनकारक राहील.

८. आवश्यक प्रमाणपत्रे- अर्जासोवत खालील प्रमाणपत्रांच्या साक्षांकीत प्रती जोडणे आवश्यक आहे. अन्यथा अर्जाचा विचार केला जाणार नाही.

१. एम.वी.वी.एस ची सर्व गुणपत्रे व प्रयत्न प्रमाणत्र अंतरवासिता प्रमाणपत्र पासिंग व डिग्री प्रमाणपत्र
२. एम.डी/ एम.एस/डी.एन.बी. परीक्षा गुणपत्रीका पासिंग प्रमाणपत्र डीग्री प्रमाणपत्र व प्रयत्न प्रमाणपत्र
३. एम.वी.वी.एस. व एम.डी /एम.एस पदवी/ पदवीका एम.एन.सी नोंदणी प्रमाणपत्र तसेच आवश्यक असल्यास नोंदणीचे नुतनीकरण
४. बंधपत्र प्रमाणपत्र
५. अनुभव प्रमाणपत्र
६. मागासवर्गीय उमेदवारांसाठी जातीचे प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र व आवश्यक असल्यास वैध नॉनक्रिमीलीयर प्रमाणपत्र
७. विजा.अ, भज.ब, भज.क, भज.ड, ईमाव, विमाप्र, साशेमाव तसेच आदुघसाठी प्रचलीत शासकीय नियमानुसार वैधता असलेले उन्नत गटात मोडत नसल्याबाबतचे नॉनक्रिमीलीयर प्रमाणपत्र आवश्यक.
८. जन्म तारखेचे प्रमाणपत्र
९. नावात वदल असल्यास गॅझेटची प्रत.
१०. आधार कार्ड व पॅन कार्ड ची प्रत.

Scanned with OKEN Scanner

११. सदर पदांकरिता उमेदवारांची नियुक्ती निव्वळ १८० दिवसांसाठी व अत्यंत तात्पुरत्या कंत्राटी स्वरुपात राहील. १८० दिवसानंतर रिक्त पद उपलब्ध असल्यास तांत्रीक खंड देऊन पुन्हा १८० दिवसांसाठी नियुक्ती करिता विचार करण्यात येईल.

१२. निवड झालेल्या उमेदवारास पुण्यश्लोक अहिल्यादेवी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, बारामती. संस्थेतील कोणत्याही संलग्न रुग्णालयात नेमणूक केली जाईल व तेथे काम करावे लागेल प्रशासना आवश्यकता असल्यास यापैकी कोणत्याही रुग्णालयात बदल होऊ शकेल अर्जा सोबत प्रमाणपत्रांच्या छायांकीत प्रती सांक्षांकीत करुन जोडणे आवश्यक आहे. अन्यथा अर्जाचा विचार केला जाणार नाही.

१३. सदर पदावर कार्यरत असताना आपणांस खासगी व्यावसाय करता येणार नाही.

१४. सदर नियुक्ती ही तात्पुरत्या स्वरुपात असल्यामुळे आपणांस या पदावर कायम स्वरुपाचे कोणतेही हक्क राहणार नाहीत. व कायम नियुक्तीचे कोणतेही फायदे अनुज्ञेय नसतील या बाबत कोणत्याही न्यायालयात दावा दाखल करता येणार नाही.

१५. पदाचा राजीनामा देण्याकरिता १ महिन्याची पुर्व सुचना देणे आवश्यक राहील अन्यथा नोटीस न देता पदाचा राजीनामा दिल्यास शेवटच्या १ महिन्याचे देय वेतन शासन खाती जमा करण्यात येइल.

१६. भरती प्रक्रिया पुर्ण होई पर्यंत कोणत्याही टप्प्यावर पदस्थितीमधे बदल होऊ शकतो.

१७. अर्ज भरण्याच्या प्रक्रियेची माहीती

अधिष्ठाता,
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, बारामती.

प्रति,

१. उपरोक्त संबंधित सर्व विषयातील प्राध्यापक व विभागप्रमुख, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, बारामती.
२. सुचनाफलक- अधिष्ठाता कार्यालय, विद्यार्थी विभाग, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, बारामती.
३. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई, पुणे, सोलापुर, कोल्हापूर, अंबाजोगाई, लातूर, मिरज, नांदेड, अकोला, यवतमाळ, नागपुर, धुळे, औरंगाबाद, चंद्रपुर, गोंदिया, सातारा, सिंधुदुर्ग, अलिबाग, उस्मानाबाद, परभणी, रत्नागिरी, नंदुरबार, जळगाव, जालना.
४. रोखपाल, रोखपाल शाखा, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, बारामती. यांना आदेशित करण्यात येते की, त्यांनी महाविद्यालयाच्या इच्छुक सहाय्यक प्राध्यापक, वरिष्ठ निवासी, उमेदवारांकडून (शासकीय सुटटी वगळुन) या कार्यालयातुन जाहिरातीच्या दिनांकापासून विहित कालावधीत फॉर्म फी रु.१००/- (अक्षरी रुपये शंभर फक्त) स्विकारुन उमेदवारास शासकीय पावती द्यावी.
५. मा.सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
६. मा.आयुक्त (वैद्यकीय शिक्षण) संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
७. मा.संचालक, संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.

Scanned with OKEN Scanner